Copy of Regular Affiliation Letter 2012-13 [ ABL]

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

## औरंगाबाद - ४३१००४. महाराष्ट्र (भारत)

(नॅक समिती तर्फे बी + दर्जा प्राप्त )


दूरध्वनी कार्यालय } २४०३३९९, २४०३४००
कुलसचिव (का.) २४०३३३३ (नि.)२४००२०३
फॅक्स :(०२४०) २४०३११३, २४०३३३५
तार : बामुसिटी
Web Site-WWW.bamu.net
E-mail: registrar@bamu.net

विद्यापीठ परिसर
औरंगाबाद-४३१००४
(महाराष्ट्र)


---

संदर्भ क्रमांक : शैक्ष/संलग्न/एबीएल/१४५/२०१२-२०१३/ 32815-21 दिनांक ०३ ऑक्टोबर २०१२

प्रति,
प्राचार्य,
जी. एस. मंडळ संचलित, महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी,
सातारा परिसर, बीड बायपास,
औरंगाबाद.

**विषय :-** जून २०१२ पासुन पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे संलग्नीकरण चालु ठेवणे / संलग्नीकरणाचा विस्तार करणे बाबत.....

**संदर्भ :-** शैक्ष/संलग्न/एबीएल/१४५/२०१२-२०१३/२४९७२-७८ दिनांक ३० सप्टेंबर २०१२.

**महोदय / महोदया,**

जून २०१२ पासुन महाविद्यालय संलग्नीकरण चालु ठेवणे / संलग्नीकरणाचा विस्तार करणे बाबत आपल्या अर्जावर / प्रस्तावावर महाविद्यालयास भेट देऊन अहवाल सादर करण्यासाठी महाविद्यालयीन संलग्नीकरण समिती नियुक्त करण्यात आली होती.

महाविद्यालयीन संलग्नीकरण समितीने प्रस्तुत प्रकरणी आपल्या महाविद्यालयास भेट देऊन सादर केलेल्या अहवालावर विद्या परिषदेच्या दिनांक १९-०६-२०१२ व दिनांक ०६-०७-२०१२ रोजी झालेल्या बैठकीत विचार होऊन महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम (८१) व (८३) मधील तरतुदीनुसार परिशिष्ट " अ " मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेसह अटी व शर्तीच्या अधिन राहुन जून २०१२ पासुन एका वर्षाकरीता पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी संलग्नीकरण चालु ठेवणे / संलग्नीकरणाचा विस्तार करणे / नैसर्गिक वाढीस मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम (८१) व (८३) च्या तरतुदीनुसार विद्या परिषदेचा उपरोक्त निर्णय आपणास कळविण्यात येत असुन विनंती करण्यात येते की, विद्या परिषदेने संलग्नीकरणाबाबत निर्धारित केलेल्या अटींची पूर्तता तीन महिन्यात करावी व अटींच्या पूर्ततेबाबतचे हमीपत्र विद्यापीठास दि. ३०-१०-२०१२ पर्यंत सादर करावे. तसेच या अटीच्या पुर्तते बाबतचा अहवाल दि. ३१-११-२०१२ पूर्वी विद्यापीठास सादर करावा.

विद्यापीठाने निर्धारित केलेल्या ५०० गुणांपैकी किंवा आपल्या महाविद्यालयास लागू असलेल्या एकुण गुणांपैकी संलग्नीकरण समितीच्या अहवालानुसार शेकडा ८८.९८% गुण प्राप्त झालेले आहेत. तसेच यापूर्वी विद्यापीठाने दिलेल्या वेगवेगळया आदेशांच्या पुर्तता व अटींच्या अधिन राहुन पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी हे संलग्नीकरण देण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

अभ्यासक्रम व प्रवेशक्षमते बाबत माहिती [परिशिष्ट " अ "]

| अ.क्र. | पदवीचे नांव | अभ्यासक्रम / विषयाचे नांव (पदवी / पदव्युत्तर ) | कायम संलग्नीत अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमते निहाय नावे | शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ साठी विद्या परिषदेने मान्य केलेली प्रवेश क्षमता | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | पदवी | सिव्हिल इंजिनिअरींग | --- | ६० | |
| | | मॅकेनिकल इंजिनिअरींग | --- | ६० | |
| | | इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग | --- | १२० | |
| | | कॉम्प्युटर सायन्स अॅण्ड इंजिनिअरींग | --- | ६० | |
| | | इन्स्टुमेटेशन इंजिनिअरींग | --- | ०० | |
| | | प्रॉडक्शन इंजिनिअरींग | --- | ०० | |
| | | अॅग्रीकल्चर इंजिनिअरींग | --- | ३० | |
| | | प्लॅस्टीक अॅण्ड पॉलिमर इंजिनिअरींग | --- | ६० | |
| | | मेकॅनिकल इंजिनिअरींग (द्वितीय पाळी) | --- | ६० | |
| २. | पदव्युत्तर | एम. टेक. मेकॅनिकल इंजिनिअरींग | --- | १८ | |
| | | एम. बी. ए. | --- | ६० | |

**अटी :-**

**पदवी**

१. नियमीत प्राचार्यांची नियुक्ती करण्यात यावी.
२. नियमीत ग्रंथपालाची नियुक्ती करण्यात यावी.
३. विद्यापीठाच्या नियमानुसार मागासवर्गीस प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापकाची पदे भरण्यात यावीत.

**पदव्युत्तर**

१. नियमीत प्राचार्यांची नेमणुक करावी.
२. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापकाच्या नियुक्या विद्यापीठ नियमानुसार करव्यात.

आपला विश्वासू,
संचालक
महाविद्यालये व विद्यापीठ
विकास मंडळ

**प्रतिलिपी : [परिशिष्ट " अ "].**

१. मा. सह संचालक [उच्च शिक्षण ], औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.
२. मा. परिक्षा नियंत्रक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.यांना माहितीस्तव अग्रेषित.
३. उपकुलसचिव [विशेष कक्ष ] डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.यांना माहितीस्तव अग्रेषित
४. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान मंडळ मर्यादित, [MKCL ] आय. सी. सी. ट्रेड टॉवर, ५ वा मजला, अे विंग सेनापती बापट मार्ग, पुणे यांना माहितीस्तव अग्रेषित.
५. अधिक्षक, अव्यावसायिक विभाग, (शैक्षणिक विभाग), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. यांना माहितीस्तव अग्रेषित.
६. सहाय्यक अधिक्षक, पात्रता युनिट (शैक्षणिक विभाग), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.यांना माहितीस्तव अग्रेषित.

संचालक
महाविद्यालये व विद्यापीठ
विकास मंडळ